आर.सी.सी. क्र. २७७/२०१६
शासन वि. संदिप
नि.क्र. ५६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी शपथेवर सुरु**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,
माझे नाव – दशरथ आत्माराम माने
वय – ६० वर्षे, व्यवसाय – नोकरी
रा. ,सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक

-------------------------------------------------------

**सरतपास – अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एफ. ए. शेख यांचे द्वारा–**

दिनांक ०९.०८.२०१६ रोजी मी फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि., माळेगाव, ता. सिन्नर, या कंपनीमध्ये सेक्युरिटी एक्झेक्युटिव्ह म्हणुन कार्यरत होतो. दिनांक ०९.०८.२०१६ रोजी माझे वरिष्ट अधिकारी पोहरे यांनी मला सांगितले की, ''वावी पोलीस स्टेशन येथुन फोन आला होता, आपणाला पंचनाम्याकरिता वावी पोलीस स्टेशन येथे जायचे आहे''. त्यानंतर मी व पोहरे वावी पोलीस स्टेशन येथे गेलो. वावी पोलीस स्टेशन येथे गेल्यावर तेथील पोलीस कर्मचा–यांनी आम्हाला सांगितले की, फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि., गोंदे येथे प्लॉस्टीकच्या कॅरेटसची जी चोरी झालेली आहे, त्यातील काही आरोपींनी गुन्हा कबुल करुन, चोरीचा माल कोठे ठेवला आहे, तो काढुन देणार आहेत, आपल्याला तिकडे जायचे आहे.

२. आरोपी हा पोलीस गाडीमध्ये आहे, तुम्ही त्याच्या पाठीमागे तुमच्या वाहनाने जा, असे आम्हाला पोलीसांनी सांगितले. त्यानंतर मी व माझा ड्रॉयव्हर माझ्या गाडीने पोलीसांच्या गाडीच्या मागे गेलो. त्यानंतर वेल्हेवाडी येथे एका घरासमोर पोलीसांनी गाडी थांबवली. त्यानंतर तेथे पोहोचल्यावर आम्ही व पोलीस गाडीतुन उतरलो. तेथे रस्त्याच्या बाजुला प्लॉस्टीकचे मोकळे कॅरेटस पडलेले आम्हाला दिसले. प्लॉस्टीकचे मोकळे कॅरेटस किती होते, हे मला सांगता येणार नाही. तेथे आम्ही व पोलीस होतो. त्यावेळी आरोपी पोलीसांच्या गाडीतुन खाली उतरले

नाही. त्यानंतर तेथे कॅरेटस आम्हाला दाखविण्यात आले. त्यावर एफ.एन.आय असे लिहिलेले होते. त्यानंतर पोलीसांनी तिथला झालेला मजकुर लिहुन घेतला. त्यानंतर पोलीसांनी जो पंचनामा तयार केला, त्यावर माझी व आरोपीची सही घेतली. मला पंचनामा दाखवियल्यास मी ओळखु शकतो. आता मला दिनांक ०९.०८.२०१६ रोजीचा डिस्कव्हरी पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५७** देण्यात येते. मला त्यावेळी हजर असलेल्या आरोपीचे नाव सांगता येईल, त्याचे नाव साळवे आहे. त्या आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकत नाही. कारण घटनेला आता ९ ते १० वर्ष झालेली आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास– आरोपी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. बी. बी. चांदोरे यांचेमार्फत–**

३. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याकरिता मला पोलीस स्टेशनमधुन फोन आलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मला पंचनामा करण्याकरिता बोलवण्याकरिता पोलीसांकडुन कोणतेही पत्र अथवा कोणताही माणुस मला बोलवायला आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वावी पोलीस स्टेशनच्या पोलीस कर्मचा–यांना ओळखत नाही व त्यांच्याकडे माझा पत्ता अथवा फोन नंबर नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोहरे यांच्या सांगण्यावरुन वावी पोलीस स्टेशन येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना काय सांगायचे, हे मला पोहरे यांनी सांगितले होते. पोहरे यांनी मला वावी पोलीस स्टेशनला पंचनामा करण्याकरिता जायचे आहे, म्हणुन मला वावी पोलीस स्टेशनला पाठवले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी वावी पोलीस स्टेशनला जाताना पोहरे हे माझ्या सोबत होते. ज्यावेळी आम्ही वावी पोलीस स्टेशनला दिनांक ०९.०८.२०१६ रोजी गेलो, त्यावेळी तेथे अढांगळे हे पोलीस कर्मचारी होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्यावेळी दिनांक ०९.०८.२०१६ रोजी पोलीस स्टेशनला गेलो, त्यावेळी मी, पोहरे व अढांगळे यांच्याशिवाय इतर कोणीही नव्हते.

४. दिनांक ०९.०८.२०१६ रोजी पोलीस गाडीमध्ये केवळ अढांगळे व आरोपी होते. घटनास्थळी १५० ते १७५ कॅरेटस पडले होते. घटनास्थळी पडलेले कॅरेटस हे फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि.,गोंदे या कंपनीचेच होते, याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. मी व पोहरे ज्या गाडीने घटनास्थळी गेलो, त्याआधी आमच्या गाडीची पंचांसमक्ष पाहणी अथवा झडती केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ५७ वरील पंचनाम्यावर मी न वाचता सही केलेली आहे.
प्रश्नः पोहरे ज्यावेळी दिनांक ०९.०८.२०१६ रोजी तुमच्यासोबत होते, त्यावेळी त्यांनी नि. क्र. ५७ च्या पंचनाम्यावर सही का केली नाही?
उत्तरः नि.क्र. ५७ च्या पंचनाम्याच्या अनुक्रमांक १ वर पोहरे यांची सही आहे.

५. पोहरे यांनी मला फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि.,गोंदे येथे किती प्लॅस्टीकच्या कॅरेटसची. चोरी झाली होती, हे मला सांगितले नाही व माझ्यासमक्ष पोलीसांना देखील सांगितले नाही. फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि.,गोंदे येथील किती प्लॅस्टीकच्या कॅरेटसची चोरी झाली, ही बाब मी पोलीसांना सांगितली नाही. मी दिनांक ०९.०८.२०१६ रोजी वावी पोलीस स्टेशनला जाण्यापुर्वी व तेथे पोहोचल्यावर देखील कोणत्या गुन्हयासंदर्भात आम्ही पंचनाम्याला जात आहोत, हे मला पोलीस स्टेशनला जाण्यापुर्वी माहिती नव्हते. फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि., गोंदे येथे चोरी झाल्याबाबतची माहिती मला पोहरे यांनी दिली. हे म्हणणे खरे नाही की, पोहरे यांच्या सांगण्यावरुन मी नि.क्र. ५७ वरच्या पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोहरे हे माझे वरिष्ट असल्यामुळे मी पंचनाम्याला गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी न्यायालयात वरिष्टांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

६. आम्ही ज्या रस्त्याच्या ठिकाणी कॅरेटस सापडले तेथे गेलो, तो रस्ता कोणता होता,

कोणत्या गटातील होता, हे मला सांगता येणार नाही. सदर रस्त्याच्या ठिकाणी ज्यावेळी आम्ही दिनांक ०९.०८.२०१६ रोजी गेलो त्या रस्त्याचे कोण मालक आहे, हे मला सांगता येणार नाही. तो रस्ता वेल्हेवाडी या गावच्या बाजुला होता. ज्या ठिकाणी कॅरेटस सापडले, तो रस्ता वेल्हेवाडीच्या बाजुला आहे, हे मला पोलीसांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी सांगितल्यामुळेच मला त्या भागाचे नाव माहिती पडले. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.०८.२०१६ रोजी मी कोठेही गेलो नाही व माझ्या समक्ष एफ.एन.आय नावाचे कोणतेही कॅरेटस जप्त करण्यात आले नाही.

**उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे पुर्ण.**

**उलटपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे वकिल श्री. पी. आर. ढमाले यांचेमार्फत–**

७. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ५७ च्या पंचनाम्यावरील मजकुर हा पोलीसांना माहिती असलेल्या बाबींवर लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ५७ च्या पंचनाम्यावरील मजकुराबाबत मला व्यक्तिशः माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ५७ वर काय लिहिले आहे, हे मला सांगता येणार नाही.

८. माझे शिक्षण इयत्ती दहावी पर्यत झालेले आहे. मला लिहितावाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०९.०८.२०१६ रोजी मी पोलीसांच्या गाडीने प्रवास केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दिवशी मी आरोपीबरोबर गाडीमध्ये नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि.,या कंपनीचे, गोंदे व माळेगाव येथे एक–एक युनिट आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि., माळेगाव येथे सिक्युरिटी एक्झीक्युटीव्ह असल्यामुळे मला न्यायालयात साक्षीकामी येणे क्रमप्राप्त आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फुडस ॲन्ड इन्स प्रा. लि.,या कंपनीच्या माळेगाव युनिटला असल्यामुळे मला घटनेबाबत काहीही माहिती नाही. हे

**आर.सी.सी. क्र. २७७/२०१६**
**शासन वि. संदिप**
**नि.क्र. ५६**

म्हणणे खरे आहे की, फुडस अॅन्ड इन्स प्रा. लि., या कंपनीच्या माळेगाव युनिटला, गोंदे युनिटला काय झाले आहे, हे माहित नसते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण घटनाक्रम खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फुडस अॅन्ड इन्स प्रा. लि., या कंपनीचा कर्मचारी असल्यामुळे मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.०८.२०१६ रोजी मी पोलीसांसोबत कोठेही गेलो नाही व माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा झाला नाही.

**उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे पुर्ण.**

९. **फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क. केले.

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि.१५/१०/२०२५.

RUSHIKESH RAMDAS JADHAV
Digitally signed by RUSHIKESH RAMDAS JADHAV
Date: 2025.10.16 11:16:54 +0530

(ऋ.रा.जाधव)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्र. २, सिन्नर.

आर.सी.सी. क्र. २७७/२०१६
शासन वि. संदिप
नि.क्र. ५६

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment/Deposition are same word to word as per the original Order/Judgment/Deposition.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Morankar |
| Court | : | 2nd Jt. Judicial Magistrate F.C., Sinnar |
| Date | : | 15.10.2025 |
| Deposition signed by the Presiding Officer | : | 15.10.2025 |
| Deposition Uploaded on | : | 16.10.2025 |